

अलिबाग : सीएफटीआय फाऊंडेशनच्या आरोग्यविषयक तपासणीला झालेली नागरिकांची गर्दी.

# 'किचन क्लिनिक'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

अलिबाग (बातमीदार) : 'सीएफटीआय फाऊंडेशन'तर्फे मॅपल आयव्ही हॉटेलमध्ये झालेल्या मोफत 'किचन क्लिनिक विथ चारमेन' या आरोग्यविषयक तपासणीला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. त्या वेळी प्रसिद्ध डॉक्टर चारमेन डिसोजा यांनी मार्गदर्शन करताना स्वयंपाकघरात अगदी सहज उपलब्ध असणाऱ्या आहारातील जिन्नस वापरून आरोग्य समस्या दूर करता येऊ शकते, असे सांगितले. शिबिरात सहभागी झालेल्या प्रत्येकाचे बायो ॲनालिसीस केल्यानंतर त्यांना डॉ. चारमेअन डिसोजा यांनी बायो ॲनालिसीस रिपोर्टची तपासणी करून प्रत्येकाला सुयोग्य उपचारपद्धती समजावून सांगितल्या. पीएनपी एज्युकेशनच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, ॲड. आस्वाद पाटील, आंबेपूरच्या सरपंच भावना पाटील, युवानेते सवाई पाटील, ॲड. नीता पाटील, नगरसेविका सुरक्षा शहा, डॉ. राजश्री चांदोरकर, डॉ. विनायक पाटील, डॉ. प्रणाली पाटील उपस्थित होते.